**विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेंतर्गत देय लाभ सुधारित वाढीव दराने लागू करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : आधार-२०२६/प्र.क्र.१५६/ई-१८९५८६४/योजना-१**

३ रा मजला, नवीन प्रशासन भवन,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मुंबई-४०००३२.

दिनांक : २७ ऑक्टोबर, २०२६.

---

**वाचा :-**

१. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र. वगृयो-२०२२/प्र.क्र.११/योजना-५, दिनांक १३ डिसेंबर, २०२३.

२. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र. वगृयो-२०२२/प्र.क्र.११/योजना-५, दिनांक ११ मार्च, २०२४.

३. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र. आधार-२०२५/प्र.क्र.१६८/योजना-१, दिनांक ३ नोव्हेंबर, २०२५.

४. शासन निर्णय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्र. आधार-२०२६/प्र.क्र.१३८/ ई-१८६२९९९/योजना-१, दिनांक १५ ऑक्टोबर, २०२६.

५. मा. मुख्य सचिवांचे कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्र क्र. मंत्रिमंडळ बैठक दि. ०६.१०.२०२६ (विषय क्रमांक १०) चे कार्यवृत्त.

**प्रस्तावना :-**

विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) हा समाज प्रामुख्याने सातत्याने स्थलांतरित राहिल्यामुळे शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या उपेक्षित राहिलेला आहे. या प्रवर्गातील बहुतांश घटकांचे जीवन आजही भटके असून, त्यांना रोजगाराच्या शोधात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सातत्याने भटकंती करावी लागते. या सातत्यपूर्ण स्थलांतरामुळे आणि उत्पन्नाच्या साधनांचा अभाव असल्यामुळे या कुटुंबांना कठीण परिस्थितीचा सामना करावा लागतो.

भटक्या जीवनशैलीचा सर्वात मोठा आणि गंभीर फटका या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बसतो. अशा प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत, अत्यंत जिद्दीने ज्यावेळी या प्रवर्गातील विद्यार्थी उच्च व व्यावसायिक शिक्षणाकडे वळतात, त्यावेळी त्यांना मोठ्या शहरांमध्ये निवास, भोजन आणि शैक्षणिक साहित्याचा खर्च पेलणे आर्थिकदृष्ट्या जिकिरीचे होते. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांकरिता 'भारतरत्न डॉ.

बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' राबवली जात आहे. त्याच धर्तीवर इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत यापूर्वी 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना' शा.नि.क्र.वगृयो-२०२२/ प्र.क्र.११/ योजना-५, दिनांक १३ डिसेंबर, २०२३ अन्वये सुरू करण्यात आली आहे.

यानुषंगाने, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये महागाई निर्देशांकानुसार 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' या योजनेच्या भत्त्यांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, सदर बैठकीतील विषय क्रमांक १० च्या निर्णय क्र. ३ नुसार, या सर्व सुधारित तरतुदी व वाढीव लाभांची रक्कम विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनाही लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यास अनुसरून शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा. मंत्रिमंडळाच्या दि.०६.१०.२०२६ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.१० मधील निर्णय क्र.३ नुसार, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना भोजन भत्ता, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सोयी-सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी देण्यात येणारे आर्थिक लाभ खालीलप्रमाणे लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे:

| अ.क्र. | खर्चाची बाब | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड व नागपूर या ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी | इतर महसुल विभागीय शहरातील व उर्वरीत 'क' वर्ग महानगर पालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी | इतर जिल्ह्याच्या ठिकाणी तसेच, महानगर पालिकेच्या हद्दीपासून ५ कि.मी. परिसरात असलेली महाविद्यालये/शैक्षणिक संस्था या ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी | तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी |
|---|---|---|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | रु. ४२,०००/- | रु. ३७,०००/- | रु. ३२,०००/- | रु. ३०,०००/- |
| २ | निवास भत्ता | रु. २८,०००/- | रु. २१,०००/- | रु. १७,०००/- | रु. १३,०००/- |
| ३ | निर्वाह भत्ता | रु. १०,०००/- | रु. १०,०००/- | रु. ८,०००/- | रु. ७,०००/- |
| | **एकूण** | **रु. ८०,०००/-** | **रु. ६८,०००/-** | **रु. ५७,०००/-** | **रु. ५०,०००/-** |

२. उपरोक्त नमूद रक्कमेव्यतिरीक्त पात्र वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष रु. ८,०००/- आणि अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना रु. ४,०००/- इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी ठोक स्वरूपात देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

३. सदर सुधारणा सन २०२६-२७ या वर्षापासून लागू राहतील व सदर योजनेकरीता संदर्भीय शासन निर्णय दि.१३.१२.२०२३, दि.११.०३.२०२४, दि.०३.११.२०२५ व दि.१५.१०.२०२६ मधील इतर अटी व शर्ती या कायम राहतील.

४. सदर शासन निर्णय दि.०६.१०.२०२६ रोजीच्या मा. मंत्रिमंडळाच्या मंजुरीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६१०२७१४५४०६५१३४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DINESH ROHIDAS CHAVAN

Digitally signed by DINESH ROHIDAS CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=OTHER BACKWARD BAHUJAN WELFARE, 2.5.4.20=710100F49F6FEBD6B7D4E931019C4DB852728FB51C38DC86F98376D9A13C1211, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8C2377ED235498603821D49922A210871FF6FB9B369722AC707AEE7DCD87F2BD, cn=DINESH ROHIDAS CHAVAN
Date: 2026.10.27 14:55:29 +05'30'

**(दिनेश चव्हाण)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री ( इ.मा.ब.क. ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता,विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई/नागपूर.
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १./२, मुंबई/नागपूर.
९. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे.
१०. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
११.सर्व प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग.
१२.सर्व सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग.
१३.निवासी लेखा परिक्षक, मुंबई.
१४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१६.निवड नस्ती (योजना-१)